माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**दाखल केलेली तक्रार**

**क्र.मुमाआ/नों.क्र.७७१/२४/त.क्र.६१/२५/०१**

**Mr. Zahid F. Khambatti**
Eastern Sanitary Works,
17, New Malinee co.op. soc. Ltd,
42] Mahakali Caves Road,
Andheri East, Mumbai-400093

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता-२ (इ व का) एच/पश्चिम विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिक सहाय्यक आयुक्त एच/पश्चिम विभाग यांचे कार्यालय,
२ री हसनाबाद लेन, खार (पश्चिम), मुंबई – ४०००५२.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ व का) एच/पश्चिम विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिक सहाय्यक आयुक्त एच/पश्चिम विभाग यांचे कार्यालय,
२ री हसनाबाद लेन, खार (पश्चिम), मुंबई – ४०००५२.

**<u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : १६.०९.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर तक्रार अर्जावर आज दि.१६.०९.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान तक्रारदार अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने) एच/पश्चिम विभाग, श्री. राहुल निवृत्ती बोडके उपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इमारत व कारखाने) एच/पश्चिम विभाग अनुपस्थित आहेत.

या तक्रार संदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, तक्रारदार श्री. झाहिद खंबाती यांनी द्वितीय अपील क्र.१५०८/२३/०१ दि.०२.०१.२०२४ रोजीच्या सुनावणीत पारित केलेल्या आदेशाचे अनुपालन झाले नसल्याचा आक्षेप नोंदवून दि.०२.०८.२०२४ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम १८ अंतर्गत तक्रार अर्ज दाखल केला असून माहिती नाकारण्यात आली असल्याचा आरोप करण्यात आलेला आहे. प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना जोडपत्र-अ मधील मागणी केलेली माहिती आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत द्यावी तसेच जी माहिती देता येत नाही, त्याबाबतचे स्पष्ट कारण तक्रारदारास कळवावे, असा आदेश पारित केला होता.

आज झालेल्या खुलाशात तक्रारदार यांनी विचारलेल्या मुद्दा क्र.A व B याबाबतची माहिती या कार्यालयात कागदोपत्री स्वरुपात उपलब्ध नसल्याचे याआधी तक्रारदार यांना कळविण्यात आले असून मुद्दा क्र.C बाबत कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती तक्रारदार यांना याआधीच पुरविण्यात आलेली आहे. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने) एच/पश्चिम विभाग यांनी दि.०२.०१.२०२४ रोजी पारित केलेले आदेश या कार्यालयास प्राप्त झाले नसल्यामुळे सदर आदेशाचे पालन करणे या कार्यालयास शक्य झाले नाही. तसेच कार्यालयीन अभिलेखावर उपलब्ध असलेली माहिती ही याआधीच तक्रारदार यांना प्रदान करण्यात आली असल्याने प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढावा, अशी विनंती केलेली आहे. प्रस्तुत प्रकरणी सादर केलेला खुलासा प्रथम दर्शनी समाधानकारक वाटत असून अपिलीय आदेशात नमूद केलेल्या निर्देशाचे याआधीच पालन झाल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता, तसेच कार्यालयीन अभिलेखात नमूद केलेली व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम २(च) प्रमाणे उपलब्ध असलेली माहिती ही आधीच प्रदान केली असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**वरील तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १६.०९.२०२५**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission
Maharashtra